**<u>नि.फौ.खटला क्र.४४८/२०२१</u>**

महाराष्ट्र शासन

**विरुध्द**

राहुल दशरथ काटकर वगैरे ३

## नियमित फौजदारी खटला क्र.४४८/२०२१ मधील नि.क्र.४१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज आरोपी क्र.३ यांनी फौजदारी संहिता कलम २३९ अन्वये प्रस्तुत खटल्यातून निर्दोषमुक्त करणेकरिता दाखल केला आहे. आरोपी क्र.३ याच्या कथनानुसार शंकर सुरेश चव्हाण यांनी फिर्याद दाखल केलेनंतर आरोपीविरुध्द महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ३९, ४५ दोषारोपपत्र दाखल आहे. फिर्यादी यांनी दाखल केलेली फिर्याद व महाराष्ट्र सावकारी कायदा २०१४ यातील तरतुदीनुसार प्रस्तुत आरोपीविरुध्द महाराष्ट्र सावकारी कायदा २०१४ अन्वये गुन्हा दाखल करता येत नाही. आरोपी क्र.३ व फिर्यादी यांचेसोबत कोणताही व्यवहार झालेला नाही. प्रस्तुत कामी आरोपी क्र.३ विरुध्द कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल नाही. पोलीसांनी नोंदविलेल्या साक्षीदारांच्या जबाबामध्ये देखील आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आलेला नाही. फिर्यादीची वहिणी लता नंदकुमार चव्हाण यांनी त्यांचे नांवे असलेले इनोव्हा वाहन दिनांक ०७/०४/२०१७ रोजी नोटरी करारपत्राने सूधीर अनंत चिंचलीकर यांना दिली होती व सदर नोटरी करारपत्रावर आरोपींची साक्षीदार म्हणून सही आहे व दुसरी सही फिर्यादी शंकर सुरेश चव्हाण यांची आहे. सदर व्यवहारामध्ये अर्जदार हे नोटरी करारपत्रावरील साक्षीदार आहेत. केवळ आरोपीस त्रास देणेकरिता प्रस्तुत केसमध्ये आरोपींना गोवणेत आले आहे. सबब, आरोपी क्र.३ यांनी त्याचेविरुध्द कोणताही पुरावा पटलावर दाखल नसल्याने निर्दोषमुक्त करणेत यावे अशी विनंती केली.

२. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन अर्जास विरोध केला. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या म्हणण्यानुसार तपासाअंती आरोपीविरुध्द महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ३९, ४५ दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. दोषारोपपत्रावरुन प्रस्तुत आरोपीचा इतर आरोपींसोबत सहभाग असल्याचे व आरोपीने गुन्हा केल्याचे दिसून येते. सबब, आरोपीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. आरोपी क्र.३ यांच्या विधीज्ञांनी युक्तीवादापुष्टयर्थ मा. सर्वोच्च न्यायालय यांचा *आर.एस.नायक विरुध्द ए.आर. अंतुलय वगैरे,* एआयआर १९८६, सर्वोच्च न्यायालय २०४५, १९८६ क्रि.एल.जे १९२२ हा न्यायनिर्णय दाखल केला की ज्यामध्ये Criminal P.C. (2 of 1974), Ss 227, 239, 245 – Discharge of accused – procedures in Ss.227, 239 and 245 compared असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले.

४. आरोपीच्या अर्जासंदर्भात दोषारोपपत्राचे अवलोकन करता वर्दीजबाबामध्ये वर्दीदार शंकर चव्हाण यांनी कथन केले आहे. त्या संदर्भात साक्षीदार संजय मिरजकर याच्या तपासटिपणाचे अवलोकन करता आरोपी जितेंद्र ढोले यांनी शंकर चव्हाण यांची भावजेय लता चव्हाण यांच्या नांवे असलेली इनोव्हा गाडी गहाण ठेऊन घेऊन सहा लाख रुपये रोख दहा टक्के प्रति महा व्याजाने दिल्याचे कथन केले आहे. जितेंद्र ढोले याच्याकडून घेतलेल्या व्याजाच्या रक्कमेसाठी दरमहा साठी हजार रुपये व्याज शंकर चव्हाण हे संजय मिरजकर याच्याकडे जितेंद्र ढोले यास देण्याकरिता देत होते व ती रक्कम संजय मिरजकर हे जितेंद्र

ढोले यास देत होते असा दावा संजय मिरजकर यांनी केला आहे. प्रस्तुत साक्षीदाराच्या तोंडी पुराव्यातून आरोपी हे सकृतदर्शनी अवैधरित्या सावकारी करत असल्याचे दिसून येते. त्यानंतर फुले यांनी नोटीरीद्वारे सदर वाहन घेतल्याचे व फुले यांच्याकडून मिळालेले पैसे शंकर चव्हाण यांनी जितेंद्र ढोले यांना दिल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच त्यानंतरही राहूल काटकर व जितेंद्र ढोले हे मुद्दल व व्याजासाठी शंकर चव्हाण यास त्रास देत असल्याचे त्यांच्या तोंडी पुराव्यातून स्पष्ट होते. सदर तोंडी पुरावा हो दोषारोपपत्राचा भाग आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

आरोपी क्र.३ यांचा निशाणी ४१ येथील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

NITESH MANAGENI BANDGAR Digitally signed by NITESH MANAGENI BANDGAR

मिरज (नितेश म. बंडगर)

दिनांक : २४.०५.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मिरज

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | K. A. Udagave (III) |
| Court. | : | Civil Judge Junior Division and J.M.F.C. Miraj |
| Dictation Date | : | 24.05.2023. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 24.05.2023. |
| Order uploaded on. | : | 30.05.2023. |